www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 198 वा शुक्रवार दि. 04 एप्रिल २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर

## द•ख•ल



दैनिक युवक आधार - न्यूज 18 लोकमतचे उत्कृष्ट निवेदक आदरणीय विलासजी बडे साहेब बीड येथील कार्यक्रमाला आले असता त्यांची भेट घेऊन लोकाशारत्न पुरस्कारा साठी निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा देताना. शेख अजिजराजा सर, फैय्याज पठाण सर, शेख ताजुद्दीन सर व मित्र परिवार

(छाया- शेख महेशर, पाटोदा.)

## बेरोजगार गरीबांना श्रीमंतांचे डिलिव्हरी एजंट बनविले जातेय; डिलिव्हरी ॲपवर पीयूष गोयल यांची टीका



सध्या बाजारात ई कॉमर्स कंपन्यांची चलती आहे. लाखो लोकांना या कंपन्यांनी रोजगार दिला आहे. हे चांगले की वाईट यावर कोणी विचार केलेला नाही. कारण या नोकरीत महिन्याकाठी २० ते २५ हजार रुपये या डिलिव्हरी बॉयना सुटत आहेत. परंतु, वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी या प्रकारच्या नोकरी देण्यावर आक्षेप नोंदविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार हे डिलिव्हरी ॲप बेरोजगार गरीबांना श्रीमंतांचे डिलिव्हरी एजंट बनवत आहेत.

नवी दिल्ली येथे तीन दिवसांच्या 'स्टार्टअप महाकुंभ २०२५' च्या दुसऱ्या आवृत्तीला सुरुवात झाली. यावेळी ते उपस्थित होते. भारतीयांनी जागतिक पातळीवर जाऊन मोठा विचार करण्याची गरज आहे. इतर कंपन्यांमध्ये काम करणाऱ्यांना जगात आपली ओळख बनवावी, असे ते म्हणाले. जेव्हा आपण डीप टेककडे पाहतो तेव्हा इकोसिस्टममध्ये फक्त १००० स्टार्टअप्स आहेत. अल्पावधीत संपत्ती निर्मितीवर लक्ष केंद्रित करायचे की आंतरराष्ट्रीय पातळीवर जायचे हे स्टार्टअप्सनी ठरवायला हवे. भारतीय स्टार्टअप्स फुड डिलिव्हरी आणि वेगाने वस्तूंच्या डिलिव्हरीवर लक्ष केंद्रीत करत आहेत. बेरोजगार तरुणांना श्रीमंतांसाठी डिलिव्हरी एजंट बनवत आहेत. हे ॲप्स बेरोजगार तरुणांना स्वस्त कामगार बनवत आहेत. यामुळे श्रीमंत घराबाहेर न पडता त्यांचे जेवण त्यांना मिळत आहे, असे गोयल म्हणाले. स्टार्टअप महाकुंभ २०२५ मध्ये सुमारे ३००० स्टार्टअप्स सहभागी झाले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही संख्या दुप्पट आहे. ६४ देशांचे प्रतिनिधी यात सहभागी झाले आहेत. भारतात सुमारे १.६ लाख स्टार्टअप्सना उद्योग आणि अंतर्गत व्यापार संवर्धन विभागाने (DPIIT) मान्यता दिली आहे. १६ जानेवारी २०२५ रोजी स्टार्टअप इंडियाची ९ वर्षे पूर्ण झाली आहेत.

## शिवडी येथे विनता नदीकाठावरील विद्युत पंपाच्या तांब्याच्या तारांची चोरी

दैनिक युवक आधार
निफाड प्रतिनिधी
राहुल कुलकर्णी

शिवडी येथे विनता नदी काठावरील विद्युत पंपच्या तांब्याच्या तारा चोरणाऱ्या टोळीने एकाच रात्रीतून विनता नदी धुमाकूळ घातला असून शिवडी येथे १२ ते १५ जास्त शेतकऱ्यांच्य वीज पंपच्या तांब्याच्या धातू चोरट्यांनी लंपास केल्या आहेत. विनता नदीकाठावर असलेल्या वीज पंपांची आतील तांब्या वायर चोरून नेण्याच्या घटना घडली त्यामुळे शेतकऱ्यांना नवीन संकटाचा सामना करावा लागत आहे. नदीकाठच्या तब्बल १३ अधिक शेतकऱ्यांच्या विद्युत पंपांच्या आतील वायर रात्री चोरून नेल्या आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे एक ते दोन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. शिवडी गावाजवळून वाहणाऱ्या विनता नदीतूनच परिसरातील शेतकऱ्यांनी पाणीपुरवठा योजना करून शेतीसाठी पाणी नेले आहे. त्यासाठी गावातील प्रत्येक शेतकऱ्याचा विद्युत पंप नदीवर आहे. विद्युत पंप मध्ये तांबे धातू असतो. आणि त्या धातूला बाजारात चांगली किंमत मिळते डल्ला मारला आहे. वीज पंपाच्या वायर चोरी गेल्यामुळे उन्हाळ्यात शेतीला पाणी कसे द्यायचे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. चोऱ्यांमुळे परिसरातील शेतकरी त्रस्त झाले. निफाड पोलिसांनी चोरट्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे. दरम्यान, ऐन उन्हाळ्यातच चोरट्यांनी शेतकऱ्यांच्या विद्युत पंपाच्या केबल चोरून गेल्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे संकट निर्माण झाले आहे. विद्युत पंप बंद राहत असल्यामुळे पाण्याअभावी पिके वाया जाण्याचे दुहेरी संकट निर्माण झाले.

शेतकऱ्यांचे एक ते दोन लाखांचे नुकसान झाले. नदीतूनच शेतकऱ्यांनी पाणीपुरवठा योजना करून शेतीसाठी पाणी नेले आहे. त्यासाठी गावातील प्रत्येक शेतकऱ्याचा विद्युत पंप नदीवर आहे. यावेळी सर्व शेतकरी वर्ग उपस्थित होते.





## विचुंबे सरपंच प्रमोद भिंगारकर यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**



विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवार दिनांक ०४ एप्रिल रोजी रायगड जिल्हास्तरीय भव्य कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

विचुंबे ग्रामपंचायत समोरील विठ्ठल रखुमाई मैदानात होणाऱ्या या स्पर्धेचे उद्घाटन सायंकाळी ०४ वाजता माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

## पंतप्रधान इंटर्नशिप योजनेअंतर्गत तरुणांना मिळणार रोजगारक्षम शिक्षणाची संधी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

देशातील तरुणांना रोजगाराभिमुख शिक्षण प्रदान करणे ही काळाची गरज असल्याचे ओळखून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यालयाच्या वतीने एका अभिनव योजनेचे नुकतेच अनावरण करण्यात आले आहे. या योजनेच्या माध्यमातून २१ ते २४ वर्षे वयोगटातील तरुण विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना रोजगार हमी देणारे शैक्षणिक कोर्स प्रदान करण्यात येतात. इंटर्नशिप असल्यामुळे लाभार्थींना शिक्षणादरम्यान एकत्रित भत्ता तसेच मानधन देखील देण्यात येते. याच योजनेच्या अंतर्गत खावडा ४ पार्ट सी ( पूर्वाश्रमीची स्टरलाईट पॉवर) यांच्या वतीने कार्यान्वित असणाऱ्या ऊर्जा पारेषण प्रकल्पांमध्ये पाच लाभार्थ्यांना सामावून घेण्यात येणार असल्याचे सूत्रांकडून समजते.

पंतप्रधान कार्यालयाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकानुसार pminternship.mca.gov.in या संकेतस्थळावर इच्छुक लाभार्थ्यांनी लॉगिन करून सर्वप्रथम रजिस्टर करावयाचे आहे. त्यानंतर स्वतःचा आधार कार्डशी संलग्न असणारा मोबाईल नंबर व्हेरिफाय करायचा आहे. ही औपचारिकता पूर्ण झाल्यानंतर इच्छुक लाभार्थ्यांनी समोर दिसणाऱ्या रकान्यांमध्ये त्यांची माहिती भरायची आहे. त्यानंतर मार्कलिस्ट आणि प्रमाणपत्र ब्राउझ करून अपलोड करायची आहेत. सरते शेवटी या सगळ्याचे कन्फर्मेशन पूर्ण झाल्यानंतर त्याची एक कॉपी काढून इच्छुक लाभार्थी आपल्यापाशी ठेवू शकतात.

याच संकेतस्थळावर लाभार्थी होण्यासाठीचे निकष आणि नियम देखील प्रसिद्ध करण्यात आले आहेत. विशेष उल्लेखनीय म्हणजे या योजनेमध्ये सहा महिन्यांचा अभ्यासक्रम असून प्रत्येक महिन्यासाठी पाच हजार रुपये स्टायपेंड देण्यात येतो. तर एकत्रित भत्ता म्हणून ६ हजार रुपये देण्याची तजवीज देखील या अभ्यासक्रमात आहे. देशातील सर्वोत्तम अशा आस्थापनांबरोबर काम करायची संधी मिळाल्याने लाभार्थी विद्यार्थ्यांना अनुभवाची एक भक्कम शिदोरी आयुष्यभरासाठी मिळते. या योजनेमध्ये अर्ज करण्याची शेवटची तारीख १५ एप्रिल आहे. त्यामुळे जास्तीत जास्त लाभार्थी विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेणे गरजेचे आहे.

## ट्रान्समिशन प्रकल्प प्राधान्यक्रमाने पूर्ण करा
## विशेष बैठकीत मुख्यमंत्र्यांचे आदेश



**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

वाढत्या उन्हाच्या काहीलीमुळे विजेची मागणी वाढत आहे त्यामुळे सध्याच्या वीजपुरवठा यंत्रणेवर ताण येत असून सातत्याने वीज प्रवाह खंडित होण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. म्हणूनच या गंभीर विषयावर नुकतीच एक उच्चस्तरीय विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. मान्यता प्राप्त झालेल्या निरनिराळ्या ऊर्जा प्रकल्पांना गती देण्यासाठी प्राधान्य क्रमाने सहकार्य करा अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच पार पडलेल्या विशेष बैठकीत दिल्या. विधान भवनात मागच्या आठवड्यात राज्यामध्ये सुरू असलेल्या विविध ऊर्जा प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेणारी उच्चस्तरीय विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या बैठकीला राज्यमंत्री मेघना साकोरे - बोर्डीकर. आमदार दिलीप वळसे पाटील, मुख्यमंत्री कार्यालयाच्या मुख्य सचिव अश्विनी भिडे, अतिरिक्त मुख्य सचिव वनविभाग मिलिंद म्हैसकर, अतिरिक्त मुख्य सचिव ऊर्जा विभाग आभा शुक्ला, प्रधान सचिव पर्यावरण विभाग विनिता सिंगल, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीचे चेअरमन तथा व्यवस्थापकीय संचालक डॉक्टर संजीव कुमार उपस्थित होते. तर समस्त जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी व पोलीस जिल्हा अधीक्षक हे व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे या बैठकीत सहभागी झाले होते. फडणवीस यांनी सर्वप्रथम महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या विविध प्रलंबित प्रकल्पांचा आढावा घेतला. कुठलाही विलंब न करता हे प्रकल्प पूर्ण करा अशा आदेश वजा सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. त्यानंतर पालघर जिल्ह्यातील अनेक ट्रान्समिशन प्रोजेक्ट प्रलंबित असल्याबद्दल त्यांनी काळजी व्यक्त केली. ऊर्जा मंत्रालयाच्या गति-शक्ती प्लॅटफॉर्म चे माध्यमातून दर आधारित स्पर्धात्मक बोली घेत सदरचे प्रकल्प तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी बैठकीत दिल्या. तसेच नवी मुंबई मधील डेटा सेंटर हब साठी हरित ऊर्जा उपलब्ध करून देण्यासाठी यावेळी त्यांनी आग्रही भूमिका मांडली. यावेळी प्रकल्प उभारणी करणाऱ्या आस्थापनांना स्थानिक राजकारणी व त्यांच्याद्वारे दिल्या जाणाऱ्या उपद्रवी जीवांची झाडझडती घेण्याच्या सूचना जिल्हा पोलीस अधीक्षकांना फडणवीस यांनी दिल्या. राष्ट्र उद्धारक प्रकल्पांमध्ये स्थानिक राजकारणी लुडबुड करत असल्यास त्यांची गय करू नका अशा स्पष्ट सूचना या बैठकीत दिल्या गेल्या. गरज पडल्यास ठीक ठिकाणी पोलीस प्रोटेक्शन पुरवण्याच्या देखील सूचना दिल्या गेल्या. ट्रान्समिशन प्रकल्प वेळेत पूर्ण करणे ही काळाची गरज असल्याची भूमिका मांडत प्रकल्प उभारणाऱ्या यंत्रणांनी शासकीय यंत्रणे सोबत समन्वय साधावा व प्रकल्प वेळेत पूर्ण करावयात अशा सूचना देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी सध्या कार्य प्रगतीपथावर असणाऱ्या बाभळेश्वर - कुडूस, शिक्रापूर- रांजणगाव, जेजुरी - हिंजेवाडी, पडघा - वाडा, कोळशेत - वाडा, विश्विंडा -भेंडा, बाबळेश्वर - राजुरी - अहिल्यानगर एमआयडीसी, बोईसर - डहाणू, नागेवाडी - भोकरदन, डहाणू- सूर्य नगर MMRDA, कवडस - जव्हार, धनोरा- यवल, उमरखेड - नागभीड या वाहिन्यांच्या कामाचा आढावा घेतला.

> आगामी दहा वर्षातील विजयाची वाढती मागणी लक्षात घेता विस्तारित वीजपारेषण योजना २०२४ ३४ कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेसाठी १ लाख ५४ हजार ५२२ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत तब्बल ८६ हजार ६५६ की मी लांबीचा ऊर्जा मार्ग कॉरिडोर बनवण्यात येणार आहे.
>
> **आभा शुक्ला,**
> **अतिरिक्त सचिव, ऊर्जा विभाग**



द•ख•ल

## एटीएममधून 40 हजार रुपये काढून केली फसवणूक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

हातचलाखीने एटीएमची बदली करून त्याद्वारे चाळीस हजार रुपये काढून घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी आरोपी विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. बतुल चौगुले हा तळोजा फेज टू येथे राहत असून तो एटीएम घेऊन बँकेच्या एटीएम मध्ये गेला. त्या ठिकाणी एटीएमचे एक मशीन होते. तो आत गेल्यानंतर एक अनोळखी ईसम देखील एटीएमच्या आत आला आणि बतुल पैसे काढण्याचा प्रयत्न करत होता मात्र पैसे निघत नव्हते. यावेळी अनोळखी इसमाने मी ट्राय करतो असे बोलून एटीएम कार्ड मशीन मधून काढले आणि पुन्हा टाकल्यानंतर पिन टाकून पैसे काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पैसे आले नाहीत. काही वेळानंतर त्याने एटीएम कार्ड परत केले. आणि तो निघून गेला. बतुल घरी पोहोचला असता त्याच्या एटीएम मधून चाळीस हजार रुपये काढल्याचा मेसेज आला. अनोळखी ईसमाने त्यांची फसवणूक केली.

============

## मातीने भरलेल्या डंपरचे चाक अंगावरून गेल्याने झाला मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर:** मातीने भरलेल्या डंपरचे चाक अंगावरून गेल्याने चंदन जगबहादूर राम (वय 31) याचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. 29 मार्च रोजी सकाळी साडे दहाच्या सुमारास एका कंपनीचे काम चालू असलेल्या साइट वरती गव्हाण फाट्याच्या जवळ मातीचा भराव टाकण्यासाठी आलेला डंपर क्रमांक एम एच 46 ए एफ 41 52 वरील चालक तो चालवत असलेला डंपर माती टाकण्यासाठी पाठीमागे जोरात रिव्हर्स चालवत घेत होता यावेळी डंपरची ठोकर कॉन्ट्रॅक्टर मुकेश कुमार यांचा लेबर चंदन जगबहादूर राम याला लागली आणि तो जमिनीवर खाली पडून मातीने भरलेला डंपरचे चाक त्याच्या अंगावरून गेले. त्यात तो जखमी झाला. त्याला उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. त्या प्रकरणी डंपर चालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

==========

## कंपनीतील लोखंडी पाईपांची चोरी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

तळोजा एमआयडीसीतील कंपनीत चोरट्याने प्रवेश करून दहा लाख रुपयांचे लोखंडी पाईप चोरी केल्याप्रकरणी चोराविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तळोजा एमआयडीसी येथील निश्रा ओव्हरसीज एल पी या कंपनीत लोखंडाचे साहित्य ठेवण्यात आले होते. कंपनीचे मॅनेजर ऑर्डर प्रमाणे पाईप काढण्यासाठी गेले असता पाईप दिसून आले नाहीत. दहा लाख रुपयांचे 764 लोखंडी पाईप चोरीला गेल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

## खोदलेल्या रस्त्यांबाबत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष आक्रमक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) नविन पनवेल शहराच्या वतीने महानगर गॅस ने खोदकाम केलेल्या रस्त्याची पाहणी करून रस्त्यांची त्वरित डागडुजी न केल्यास शिवसेना स्टाईलने आंदोलन छेडण्यात येईल असा असा इशारा शिवसेना शहरप्रमुख यतीन देशमुख यांनी दिला आहे. नविन पनवेल शहरातील प्रत्येक ठिकाणी महानगर गॅस ने पाईपलाइन च्या कामासाठी रस्ते खोदून ठेवले आहेत. यामुळे नागरिकांना रस्त्यावरून प्रवास करताना खड्ड्यांचा सामना करावा लागत आहे. अनेक बाईक स्वारांचा या खोदलेल्या रस्त्यावरून जाताना अपघात देखील होत आहे, मात्र महापालिका प्रशासनाकडून याबाबत कोणतीही ठोस कारवाई होताना दिसत नाही. महापालिका आयुक्त यांनी महानगर गॅस यांच्याशी चर्चा करून या संदर्भात तातडीने उपाययोजना करावी अन्यथा शिवसेना स्टाईलने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेना शहर प्रमुख श्री यतिन देशमुख यांनी महापालिका अधिकाऱ्यांना दिला.



# ना. भरतशेठ गोगावले यांनी घेतली केंद्रिय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांची भेट...

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :-सचिन पवार**
**माणगांव रायगड**

**महाड:-** राज्याचे रोजगार हमी, फलोत्पादन आणि खारभूमी विकास मंत्री ना. भरतशेठ गोगावले यांनी आज (गुरुवारी) दिल्ली येथे केंद्रिय ग्रामविकास मंत्री ना. शिवराजसिंह चौहान यांची भेट घेतली. विकसित भारत या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेवर 'मनरेगा'च्या माध्यमातून दारिद्रय रेषेखालील नागरिकांच्या आर्थिक उन्नतीसाठी, शिवराजसिंह चौहान देत असलेल्या योगदानाबद्दल त्यांचे अभिनंदन करतानाच, या विभागार्मुत महाराष्ट्राला पुरेसा निधी मिळावा, अशी मागणी करणारे



निवेदनही ना. गोगावले यांनी त्यांना दिले. ना. शिवराजसिंह चौहान यांना दिलेल्या निवेदनात, ना. गोगावले यांनी राज्यासाठी पाच प्रमुख मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये, केंद्र शासनाने सन २०१४-१५ पासून देय असलेला ७५ टक्के साहित्य निधी, महाराष्ट्राला तातडीने देण्यात यावा, प्रशासकीय खर्चासाठी केंद्राकडून देय असलेला ५७.७८ कोटी रुपयांचा निधी मिळावा, वेतन घटक म्हणून केंद्राकडून येणे असलेला १ हजार २२८ कोटींचा निधी राज्याला मिळावा, या तीन मनरेगाशी संबंधित मागण्या ना. गोगावले यांनी केल्या आहेत. याखेरीज महाराष्ट्रात पंचवीस लाख कुटुंबे दारिद्रय रेषेखालील आहेत. तर तामिळनाडूमध्ये ४.६३ लाख कुटुंबे दारिद्रय रेषोखाली आहेत.असे असतानाही, तामिळनाडूसाठी बत्तीस कोटी मनुष्य निवासासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे, तर महाराष्ट्रासाठी केवळ१० कोटी मनुष्य निवासासाठी तरतूद करण्यात आली आहे. त्यात वाढ करण्यात यावी, त्याचप्रमाणे व्यक्तिगत मर्यादा पाच लाखांवरुन दहा लाख रुपये करण्याची मागणीही त्यांनी या निवेदनाच्या माध्यमातून केली आहे.मनरेगाच्या माध्यमातून केंद्राच्या माध्यमातून प्रत्येक कुटुंब लखपती करुन, राज्यातील प्रत्येक गाव मनरेगा मुक्त करण्याचा संकल्प आपण सोडला असल्याचा विश्वासही ना. गोगावले यांनी या निवेदनाच्या माध्यमातून केंद्रिय ग्रामविकास मंत्र्यांना दिला आहे. दिल्लीतील संसद भवनात झालेल्या या भेटीच्या वेळेस केंद्रिय आरोग्य राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव, खा. श्रीरंग बारणे, खा. श्रीकांत शिंदे आणि खा. संदीपान भुमरे हे देखील ना. गोगावले यांच्यासमवेत उपस्थित होते.केंद्रिय ग्रामविकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांच्यासमवेत झालेली भेट व चर्चा सकारात्मक होती, असे ना. गोगवले यांनी या भेटीनंतर बोलताना सांगितले.

## लोकनेते दि बा पाटील प्राथमिक आणि मध्यमिक इंग्रजी माध्यम शाळेचा वार्षीक स्नेहसंमेलन उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

पनवेल महापालिका व आयटीच संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने चालविण्यात येणा-या लोकनेते दि. बा. पाटील प्राथमिक आणि माध्यमिक इंग्रजी माध्यम शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन आयुक्त श्री. मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात मोठ्या उत्साहात झाले. यावेळी सहाय्यक आयुक्त शिक्षण विभाग डॉ. रुपाली माने, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, अधिक्षिका कीर्ती महाजन, सी यु एफ संस्थेचे सदस्य अरुण भिसे व शाळेच्या मुख्याध्यापिका कोंकना राहा आणि सर्व शिक्षक आणि पालक आदी उपस्थित होते. पनवेल महानगरपालिकेची पहिली इंग्रजी माध्यम शाळा आयटीच संस्थेच्या माध्यमातून चालवली जात आहे. यावर्षीचे या शाळेचे हे पहिले स्नेहसंमेलन होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी वर्षभरात केलेले विविध प्रकल्प यावेळी मांडण्यात आले होते. तसेच वेगवेगळ्या कलागुणांना उजाळा देण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांनी तयार केलेले आर्ट पेंटिंग यांचे देखील प्रदर्शन भरविण्यात आले होते. या कार्यक्रमास आयटीच संस्थेच्या संचालक सौम्या जैन, गीतेश शिनगारे, विवेक तमाईचेकर, सुशांत खिलारे सर्व सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती पालक व विद्यार्थी आदीचे सहकार्य लाभले.





## खांदेश्वर पोलीसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे जवळपास ७ लाख रुपये किमतीचे ४० मोबाईल हस्तगत करून केले वाटप

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

: खांदेश्वर पोलीसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे विविध राज्यातून हस्तगत केले ७ लाख ५ हजार रुपये किमतीचे ४० मोबाईल हस्तगत केले असून हे मोबाईल फोन त्यांच्या मालकांना आज (दि.०३) सुपूर्द करण्यात आले आहेत. नवी मुंबई आयुक्तालया अंर्तगत अत्याधुनिक तपास यंत्रणेचा वापर करून मोबाईल चोरीचा सामना करण्यासाठी तसेच गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध घेण्याकरीता आणि मोबाईल सुरक्षा वाढविण्याकरीता प्रोजेक्ट राबविण्यात येत आहे. हरवलेलेमोबाईल फोन याबाबतची तक्रार नोंदविण्याकरीता नागरीकांना भारत सरकार द्वारे सीइआयआर पोर्टल सुरू करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीतील सन २०२५ मार्च पर्यतचे गहाळ झालेल्या मोबाईल पैकी एकुण ४० मोबाईल खांदेश्वर पोलीसांनी यशस्वीरित्या हस्तगत करून मुळ मालकांना हस्तांतरण केले आहेत. पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, अप्पर पोलीस आयुक्त संजय येनपुरे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०२, पनवेल प्रशांत मोहीते, सहा. पोलीस आयुक्त पनवेल विभाग अशोक राजपुत यांच्या मार्गदर्शनाखाली खांदेश्वर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे. पोनि सचिन परदेशी यांनी दिलेल्या सुचना प्रमाणे सपोनि शरद बरकडे, सपोनि प्रतापराव बंडगर, पोउपनिरीक्षक सुनील साळुंखे, पोहवा महेश कांबळे, पोहवा उदय देसाई, पोहवा भाऊराव बाचकर, पोहवा धीरेंद्र पाटील, पोहवा अमित पाटील, पोना मुबारक तडवी, ऋषीकांत परदेशी, सचिन सरगर, युवराज शिवगुंडे, सचिन पवार, संदिप तस्टे वैभव शिंदे, प्रविण पाटील यांनी विविध जिल्ह्यातून व राज्यातुन आतापर्यंत ७ लाख ५ हजार रूपये किंमतीचे एकुण ४० मोबाईल हस्तगत केले आहेत. तरी सदरचे हस्तगत मोबाईल फोन आज मोबाईलचे मूळ मालकांना पोलीस ठाणे येथे बोलावुन त्यांचे मोबाईल वरिष्ठांच्या हस्ते सन्मानपुर्वक परत करण्यात आलेले आहे. मोबाईल फोन परत मिळालेल्या नागरीकांनी जनमानसातील पोलीसांची प्रतिमा उंचावल्याबाबत पोलीस ठाणे कडील सर्व अधिकारी आणि अंमलदार यांचे विशेष करून सचिन सरगर, सचिन पवार यांचे अभार मानुन कौतुक केले आहे.




### सात लाखांचे ४० मोबाईल नागरिकांना केले परत

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

खांदेश्वर पोलिसांनी गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध घेऊन सात लाख पाच हजार रुपये किमतीचे ४० मोबाईल फोन नागरिकांना परत केले आहेत. हरवलेले मोबाईल फोन बाबतची तक्रार नोंदवण्यासाठी नागरिकांना सीईआयआर पोर्टल सुरू करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीतील २०२५ मार्च पर्यंतचे गहाळ झालेल्या मोबाईल पैकी ४० मोबाईलचा सीईआयआर पोर्टल द्वारे खांदेश्वर पोलिसांनी यशस्वीरित्या हस्तगत करून मूळ मालकांना 3 एप्रिल रोजी हस्तांतरण केले. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे, पोलीस निरीक्षक सचिन परदेशी, सपोनी शरद बरकडे, प्रतापराव बंडगर, महेश कांबळे, उदय देसाई, भाऊराव बाचकर यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

## JS इन्फोटेक आणि स्वामी कॉलेज, पेण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कौशल्य विकास कोर्सेसचे उदघाटन डॉ.मुरलीधर वाघ प्राचार्य यांच्या हस्ते संपन्न

**पेण वार्ताहर**
**किरण बांधणकर**

महाराष्ट्र शासन पुरस्कृत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी व जिल्हा कौशल्य व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र रायगड यांच्या सौजन्याने तसेच JS इन्फोटेक आणि स्वामी कॉलेज पेण यांच्या वतीने मोफत रोजगारक्षम कौशल्य प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन बुधवार दि.०२ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ०९.०० वा. डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय पेणचे प्राचार्य डॉ. मुरलीधर एस. वाघ सर यांच्या हस्ते झाले यावेळी अमिता पवार (कौशल्य




विकासा सहाय्यक आयुक्त अलिबाग), जल्पा शहा (जे.एस.इन्फोटेक), सिकंदर आकलेकर, डॉ. विनायक पवार, डॉ. बाळासाहेब सरगर, प्रा. संतोष गुरव, ऋषभ शहा, पत्रकार विनायक पाटील आदींसह विद्यार्थी उपस्थित होते. स्किल इंडिया उपक्रमांतर्गत उपलब्ध असलेल्या दोन महत्त्वाच्या कोर्सेसबद्दल बोलण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जीएसटी असिस्टंट आणि सेल्स एक्झिक्युटिव्ह कोर्स विद्यार्थी आणि कामगारांना आवश्यक कौशल्ये प्रदान करतात, ज्यामुळे त्यांना चांगल्या नोकऱ्या मिळविण्यास मदत होते. व्यावसायिक कौशल्यविकास सहभागी विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये प्राप्त करून देणे. रोजगाराच्या संधी वाढवणे प्रशिक्षणानंतर रोजगार मिळविण्यास मदत करणे, जीएसटी आणि विक्री क्षेत्रातील संधींविषयी जागरूकता निर्माण करणे. स्वयंरोजगारास मदत, स्वताचा व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी योग्य मार्गदर्शन रोजगारक्षम कौशल्य प्रशिक्षण केंद्रातू मिळणार असल्याचे जे.एस.इन्फोटेकच्या जल्पा शहा यांनी सांगितले. व्यावसायिक कौशल्यविकास हा कोणत्याही करिअरच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. या कोर्सद्वारे विद्यार्थ्यांना विविध कौशल्यांमध्ये प्रावीण्य मिळवता येते जीएसटीचे नियम, विक्री तंत्रज्ञान, कर सल्लागार प्रणाली आणि सॉफ्टवेअर हाताळणी यासंबंधीचे ज्ञान या प्रशिक्षण केंद्रातून मिळतात असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# उष्मालाट नियंत्रणासाठी नागरिकांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना करावी

## जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस -. रणजीत सिंह ठाकुर

**दैनिक युवक आधार**
**वाशिम वार्ताहर**

,दि.३ एप्रिल (जिमाका) दरवर्षी वाढत्या तापमानामुळे उष्माघात आणि उष्णतेच्या लाटेचा नागरिकांवर गंभीर परिणाम होत आहे. वाढत्या उष्णतेच्या संकटाला तोंड देण्यासाठी राज्य शासनाने "उष्मालाट SOP 2025" जारी केली आहे. या मानक कार्यपद्धतीमध्ये (Standard Operating Procedure - SOP) प्रशासन, आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरिक यांच्यासाठी महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचना जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी दिल्या.याप्रसंगी उपविभागीय अधिकारी कैलास देवरे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ पीएस ठोंबरे, राज्य उत्पादन शुल्क अभिनव बालूरे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी निलेश गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात त्यांनी प्रशासनाच्या तयारीचा आढावा घेतला आणि नागरिकांनी या SOP चे काटेकोर पालन करण्याचे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले.
उष्मालाट एसपीओचे यशस्वी सादरीकरण
1. नागरिकांसाठी घ्यावयाच्या दक्षता सूचना



उन्हाळ्यात दुपारच्या वेळी (११ ते ४ वाजेपर्यंत) शक्यतो बाहेर जाणे टाळावे.
शरीरात पाण्याची कमतरता होऊ नये म्हणून भरपूर पाणी प्यावे आणि ओआरएस तसेच लिंबूपाणी, ताक, फळांचे रस यांसारखे घरगुती द्रव पदार्थ सेवन करावेत. हलके, सैलसर आणि सूती कपडे परिधान करावेत. डोक्यावर टोपी, गॉगल आणि छत्रीचा वापर करावा. उष्णतेच्या लाटेच्या वेळी थेट उन्हामध्ये कष्टाची कामे टाळावीत. लहान मुले, गर्भवती महिला, वृद्ध आणि दीर्घकालीन आजार असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घ्यावी.
2. प्रशासकीय यंत्रणेसाठी विशेष उपाययोजना
आरोग्य विभागाकडून शासकीय व खासगी रुग्णालयांमध्ये उष्णतेशी संबंधित आपत्कालीन परिस्थितीसाठी विशेष कक्ष स्थापन करणे. अत्यावश्यक सेवा पुरवठादारांनी (वीज, पाणी, वाहतूक इ.) सतर्क राहून अखंड सेवा सुनिश्चित करावी.
स्थानिक प्रशासनाने सार्वजनिक ठिकाणी जलपान केंद्रे उभारावीत आणि सावलीच्या जागांची व्यवस्था करावी.
कामगार व श्रमिकांसाठी उद्योग व बांधकाम स्थळांवर उष्णतेपासून संरक्षण मिळेल यासाठी विशेष नियोजन करणे.
हवामान खात्याच्या इशाऱ्यांवर सतत लक्ष ठेवून नागरिकांना वेळीच सूचना देणे. 3. शाळा, महाविद्यालये आणि कार्यस्थळांसाठी सूचना
उन्हाळ्यात शाळा आणि महाविद्यालयांचे वेळापत्रक समायोजित करून दुपारच्या वेळेतील सत्रे कमी करावीत.
विद्यार्थ्यांसाठी शुद्ध पाणी आणि निवाऱ्याच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.
कार्यालये आणि कारखान्यांमध्ये कामाचा वेळ लवचिक ठेवून गरजेनुसार वेळापत्रकात बदल करावा.
अत्यावश्यक नसलेल्या मैदानी खेळ आणि उपक्रम टाळण्याचा सल्ला देण्यात यावा.
4. उष्माघाताच्या तक्रारीसाठी आपत्कालीन संपर्क केंद्रे
प्रत्येक जिल्ह्यात नियंत्रण कक्ष कार्यान्वित करण्यात येणार असून त्वरित वैद्यकीय मदतीसाठी हेल्पलाइन क्रमांक जाहीर करण्यात येतील.
सार्वजनिक आरोग्य केंद्रांमध्ये उष्णतेच्या लाटेसंबंधी लक्षणे असलेल्या रुग्णांसाठी विशेष सुविधा ठेवण्याचे निर्देश.
नागरिकांना उष्णतेच्या तडाख्यापासून सुरक्षित राहण्यासाठी शासनाच्या आरोग्य विभागाने मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत.
शासनाचे आवाहन आणि निष्कर्ष राज्य शासनाने नागरिकांना आणि प्रशासनाला "उष्मालाट SOP 2025" चे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे. योग्य खबरदारी घेतल्यास उष्माघातासारख्या गंभीर आरोग्य समस्यांना टाळता येऊ शकते. प्रशासनाने वेळीच आवश्यक पावले उचलल्यास आणि नागरिकांनीही जबाबदारीने वागल्यास, महाराष्ट्रात उष्णतेच्या लाटेमुळे होणारे धोके मोठ्या प्रमाणावर कमी करता येतील. ही SOP प्रभावीपणे राबवण्यासाठी राज्य शासन आणि स्थानिक प्रशासन यांची जबाबदारी महत्त्वाची ठरणार आहे. उष्णतेच्या लाटेपासून स्वतःचा आणि आपल्या कुटुंबाचा बचाव करण्यासाठी नागरिकांनी शासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. माहितीचे सादरीकरण जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत यांनी केले. बैठकीला यंत्रणांचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

## भ्रष्ट आणि उद्धट घाटंजी तहसिलदाराची तात्काळ बदली करा चौकशी समिती समोर मनोज हामंद यांची मागणी

### अन्यथा जनहिता करिता मोठे आंदोलन उभारण्याचा इशारा दिला

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी (प्रतिनिधी - महेश पेंन्दोर)**

**घाटंजी -** येथिल भाजपा शहर सरचिटणिस तथा समाजिक कार्यकर्ते मनोज हामंद यांनी तहसिलदार विजय साळवे यांची तात्काळ बदली करा अशी मागणी केली आहे तहसिलदार बहुतांश वेळ आपल्या दालनात हजर राहत नाही आणि हजर राहले तर सामान्य नागरीकांची समस्या ऐकण्यास टाळाटाळ करतात तसेच राशन कार्ड असो की निराधार पैसे दिल्या शिवाय कोणाचेही कामे होत नाही सामान्य नागरिकांशी वागणुकही चांगली नाही असा आरोप करण्यात आला.



तहसिलदार एका विशिष्ट समाजाचे कामे करण्यावर त्यांचा अधिक भर असतो कार्यालयातील सर्व महत्वाचे टेबल जात बघून तहसिलदार साळवे यांनी बहाल केले आहे भाजपा पदाधिकारी जनसामान्यांचे कामे घेऊन तहसिल कार्यालयात गेल्यास त्यांना उद्धट वागणूकीचा अणेकदा प्रत्यय आला आहे. नुकतिच उपविभागिय अधिकारी (SDO) यांनी तहसिलर विरोधात चौकशी समिती नेमली त्या समितीने बुधवार ला तहसिलदार यांचे दालणात बसून सर्वांच्या तक्रारी ऐकल्या त्या तक्रारीत मनोज हामंद यांनी वरिल सर्व आरोप करुन तात्काळ त्यांची बदली करावी अन्यथा जनहिता करिता मोठे आंदोलन उभारण्याचा इशारा दिला.

# सेकंडरी स्कूल चिरनेर दहावी १९८५ ग्रुप चा स्नेहमेळावा उत्साहात संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/एम.डी.भोईर**

सेकंडरी स्कूल चिरनेर दहावी १९८५ ग्रुपचा स्नेहमेळावा चिरनेर हायवे येथील गजानन फोफेरकर यांच्या समर्थ कृपा या निवासस्थानी बुधवार दिनांक २ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाले. यावेळी मित्र मैत्रिणी यांनी आणलेले द्राक्षे ,खजूर, फरसाण सर्वांनी आवडीने खाल्ले. यावेळी शालेय आठवणीना उजाळा देण्यात आला.४० वर्षापूर्वीच्या सोनेरी आठवणीत ..भूतकाळात सर्व दंग झाले होते.मैदानावर खेळलेले कबड्डी, खो.. खो , शाळेतील निरोप समारंभ बोर्डाची परीक्षा, निकालाची धाकधुक शाळेतील गोड आठवणीना उजाळा देऊन गप्पांची छानशी मैफिल रंगली होती. उपस्थित महिला भगिनीचे हळदीकुंकू झाले. यावेळी गजानन फोफेरकर यांचा वाढदिवस



साजरा करण्यात आला.यानंतर ग्रुपमधील हास्यसम्राट संजय मोकल याने सर्वांना पोट धरून हसवले. या ग्रुपमधील अनेक जण उच्चपदस्थ आहेत.मात्र मित्रमैत्रिणी यांच्याबरोबर एकत्र येताना सर्वजण समानच असतात.इथे ना कोणी मोठा आणि ना कुणी लहान. ग्रुपमधील आचारी दिपक म्हात्रे, विजय पाटील,प्रकाश फोफेरकर यांनी बनविलेले स्वादिष्ट, रुचकर आणि झणझणीत मटण आणि भाकरीवर सर्वांनी यथेच्छ ताव मारला. वयाच्या ५५ वर्षी या जिगरबाज दोस्तांचा उत्साह पाहून उमर पचपन .. दिल बचपन या वाक्याची आठवण झाली.वयाची ५५ वी ओलांडलेले आणि आजीआजोबा झालेले अनेक जण या ग्रुप मध्ये आहेत. प्रत्येक सहलीत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक आणि रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा किमान एक किल्ला हे मित्र पाहतात. आणि विशेष म्हणजे कोणताही किल्ला ते एका दमात चढून जातात.नियमित योगा, व्यायाम आणि योग्य आहार हे या मित्रांच्या फिटनेस चे रहस्य आहे. २०१८ साली व्हॉट्स अप च्या माध्यमातून या ग्रुपमधील मित्र मैत्रिणींस एकत्र आणण्याचे काम या ग्रुपचे अडमिन श्री मिलिंद खारपाटील यांनी केले यानंतर गेली काही वर्ष स्नेह मेळावा, ऐतिहासिक सहली, वृक्षारोपण आदींचे आयोजन करण्यात आले. या ग्रुपचा आदर्श समोर ठेवून चिरनेर परिसरातील अनेक ग्रुपचे स्नेह मेळावे झाले. आनंदाच्या क्षणाला जसे एकत्र येतात. तसेच एकमेकाच्या अडचणीला ,संकटात हे मित्र धाऊन जातात. या स्नेह मेळाव्यासाठी मिलिंद खारपाटील, चंद्रहास म्हात्रे,पद्माकर फोफेरकर ,सूर्यकांत म्हात्रे, प्रकाश फोफेरकर, प्रकाश नारंगीकर, पंढरीनाथ नारंगीकर, सुभाष पाटील, रोहिदास पाटील, हिरामण जोशी, राजेंद्र मुंबईकर,विजय पाटील ,उपकार ठाकूर,विजय मुंबईकर, गजानन फोफेरकर,संजय मोकल , दिपक म्हात्रे, चंद्रकांत गोंधळी,रोहिदास ठाकूर,विलास हातनोलकर, प्रमोद चिरनेरकर,रवींद्र पाटील, जगदीश घरत, जयवंत नाईक, प्रदेवी पाटील,मालती भगत,चंद्रप्रभा ठाकूर, मीना परदेशी,सुरेखा पाटील,सुवर्णा म्हात्रे असे २४ विद्यार्थी आणि ६ विद्यार्थिनी उपस्थित होत्या. घरी परतताना सर्वांनी एकमेकांना साश्रू नयनांनी निरोय दिला. या मित्रमैत्रिणींच्या मैत्री बद्दल असे म्हणावेसे वाटते की,
*ही दोस्ती तुटायची नाय!*

## इंदापूर तालुक्यातील सहा ग्रामपंचायतकडून दिव्यांगनिधी वाटप

### सुभाष इंगोले यांची जिल्हा उपाध्यक्ष पदी निवड

**दैनिक युवक आधार**
**सणसरः- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील ६ ग्रामपंचायत यांनी ५% निधीचे वाटप करण्यात आले पुणे जिल्हा अध्यक्ष मा.शरद जाधव यांनी वेळोवेळी पाठपुरावा करून हा निधी वाटप करण्यास भाग पाडले यावेळी इंदापूर तालुक्यातील पवारवाडी,मानकरवाडी, थोरातवाडी.जांब,चिखली व जाचक वस्ती या सहा गावांचा निधी वाटप करण्यात आला तसेच जिल्ह्यातील व तालुक्यातील रिक्त पदांच्या नियुक्ती करण्यात आली जिल्हा उपाध्यक्षपदी सुभाष इंगोले,जिल्हा सचिव दिपक शिंदे जिल्हा खजिनदार किसन भांगे यांची बारामती,इंदापूर , दौंड या तीन तालुक्याच्या कामाची जबाबदारी देण्यात आली आहे तरी ही नियुक्ती जिल्हा अध्यक्ष यांच्या हस्ते करण्यात आली तसेच इंदापूर तालुक्यातील रिक्त पदे तालुका संपर्क प्रमुख महेश्वर जगताप,तालुका सहखजिनदार युनुस शेख यावेळी उपस्थित मान्यवर जिल्हा अध्यक्ष शरद जाधव जिल्हा जिल्हा उपाध्यक्ष सुभाष इंगोले कार्याध्यक्ष सुभाष आण्णा दिवेकर जि.खजिनदार किसन भांगे जि.सचिव दिपक शिंदे बारामती ता.अध्यक्ष मृत्युजय सावंत इंदापूर तालुका अध्यक्ष अनंतराव गायकवाड ता.उपाध्यक्ष बाळासाहेब जामदार ता.सचिव रामदास चव्हाण ता.प्रसिद्धी अध्यक्ष ज्ञानदेव कांबळे ता.कोषाध्यक्ष पोपट दराडे ता.संपर्क प्रमुख महेश्वर जगताप ता.महिलाध्यक्ष सुक्षला ढाणे ता.म.उपाध्यक्ष रुपाली जगताप इंदापूर शहर उपाध्यक्ष संजय भोसले ता.सहखजिनदार युनुस शेख माजी ता.म अध्यक्ष दिपाली वाघमोडे आदि मान्यवर उपस्थित होते यावेळी नवनिर्वाचित पदाधिकारी यांना जिल्हा अध्यक्ष यांनी शुभेच्छा दिल्या व संघटना बळकट करण्यासाठी सक्षमरुपी काम करत रहा असे सांगितले




## भरवस येथे भागवतकथेच्या कार्यक्रमाचा ध्वजारोहण व पूजन संपन्न..

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

विंचूर (नाशिक) : भरवस ता.निफाड येथील "द्वारकाधिश सेवा संस्था ट्रस्ट, श्री कृष्ण मंदिर" चे संचालक,सर्वेसर्वा पूजनीय प.पू.प.महंत श्री मयंकराज बाबा पंजाबी (अध्यक्ष महानुभाव परिषद,नाशिक) यांनी सुप्रसिद्ध आदरणीय प.पू.प.महंत श्री चिरडे बाबा यांच्या सुमधुर वाणीमधून "संगीतमय भागवत कथा" या कार्यक्रमाचे दि.०७ एप्रिल २०२५ ते दि.१३ एप्रिल २०२५ असे एकूण.७ (सात) दिवस सायंकाळी ०७:०० ते रात्री १०:०० या वेळेत "संगीतमय भागवत कथा" कार्यक्रमाचे आयोजन केलेले आहे.

"साडे तीन मुहूर्तापैकी एक मुहूर्त" असलेल्या "गुडीपाडवा" या नवीन वर्षाच्या शुभमुहूर्तावर "ध्वजपूजन आणि ध्वज उभारणे" हा उदघाटन कार्यक्रम आयोजित केलेला होता. त्यानिमित्त या कार्यक्रमाची रुपरेषा आणि सूत्रसंचालन समाधान पाटील (ग्रामपंचायत अधिकारी) ग्रुप ग्रा. पं.भरवस (मानोरी खु)यांनी केले.

या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थिती लासलगाव पोलीस स्टेशन चे सहाय्यक पोलिस निरीक्षक भास्कर शिंदे,आदरणीय प.पू.प.महंत श्री प्रेममुनी बाबा,श्री चेतन बाबा, लोकनेते सहकारी बँक लासलगाव चे सर्वेसर्वा आदरणीय नानासाहेब पाटील, भरवस गावचे पो.पाटील विलास चौधरी, ग्रा.पं.उपसरपंच संपत जाधव, ग्रा.पं.सदस्य धर्मराज जाधव, पांडुरंग जाधव, पाचोरे गावचे भूमिपुत्र आदरणीय तानाजीराव आंधळे, विजय वावधाने, किशोर गीते, बंडू पठाडे, पवार तसेच आजूबाजूच्या गावातून या कार्यक्रमासाठी हजर असलेले उपदेशी,अनुयायी व इतर जेष्ठ-श्रेष्ठ मंडळी आदी उपस्थित होते. या द्वारकाधीश सेवा संस्था ट्रस्ट श्रीकृष्ण मंदिर भरवस यांनी असे सांगितले की, या कार्यक्रमासाठी भाविक भक्तांनी- श्रोत्यांनी मोठ्या संख्येने भागवत कथा श्रवणाचा व महाप्रसादाचा दररोज लाभ घ्यावा ही विनंती.



## आई-वडिलांची सेवा करणाऱ्या मुलांना देवाची गरज भासणार नाही

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**

**शिरूरआनंतपाळ** : जे मुलं आई-वडिलांची सेवा करतात, त्यांना कुठल्याच देवाची गरज पडत नाही. कारण आई-वडील हे देवाचीच रूपे आहेत. त्यामुळे काशी- मथुरा- चारधाम तुम्हाला करण्याची गरज नाही. जिवंतपणीच आई-वडिलांची सेवा करण्याचा मौलिक सल्ला शिभप त्र्यंबक महाराज स्वामी नंदगावकर यांनी आपल्या कीर्तनातून उपदेश दिला. शिरूरआनंतपाळ तालुक्यातील येरोळ येथे हावगी स्वामी मठात आयोजीत केलेल्या अखंड शिवनाम सप्ताह, गाथा पारायण व संगित शिवकथा महोत्सव कार्यक्रमाची सांगता काल्याच्या किर्तनाने गुरूवारी संपन्न झाली. त्या निमित्ताने त्र्यंबक महाराज स्वामी उपदेशपर बोलत होते. मनुष्य जन्माला आल्यावर सोबत काहीही घेऊन येत नाही आणि जातानासुद्धा काहीही घेऊन जात नाही. आज समाजात प्रत्येकाला संपत्तीचा, ताकदीचा गर्व होत चालला आहे. ज्यांच्याकडे सोन्याची लंका होती त्या रावणाचा देखील शेवटी गर्व हरण झाला. आपण तर त्यांच्या तुलनेत खूप नगण्य आहोत. यासाठी प्रत्येकाने जीवन जगत असताना नीतिमत्ता साफ ठेवून दुसऱ्याचे चांगले होण्याची भावना मनात रुजविणे गरजेचे आहे. शिवाय आज प्रयत्न न करता प्रत्येकाला फळाची अपेक्षा आहे; परंतु घाम गाळल्याशिवाय दाम मिळत नाही. त्याचप्रमाणे प्रयत्न केल्याशिवाय फळ मिळत नाही.

व्यसनाधीनतेमुळे अनेकांचे सुखी-संसार देशोधडीला लागले आहेत. व्यसनाने माणसाचे जीवन खराब होत असून, घरातील वातावरण देखील खराब होत आहे. घरात सुख व समृद्धी नांदण्यासाठी व्यसनमुक्त जीवन जगणे काळाची गरज असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. यावेळी हभप किशन जगताप महाराज वंलाडीकर शिभप बालाजी महाराज येरोळकर, शिभप गणेश महाराज स्वामी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवकुमार साकोळकर, पिंन्टु बरदाळे,हानमंत भूसारे , चंद्रशेखर तांबोळकर, शिवानंद भुसारे, नागनाथ हिंडोळे, तानाजी सिंदाळकर, पंढरीनाथ पाटील साकोळकर, रामराव चौसष्टे, दत्ता गूरुजी बरदाळे, बाबुराव तोंडारे,




हरिश्चंद्र पाटील, बस्वराज सिंदाळकर, उपसरपंच सतिस सिंदाळकर यांच्यासह हावगीस्वामी मठ संस्थानचे सदस्यांनी परिश्रम घेतले. तर महाप्रसादाचे अन्नदाते वसंत पाटील व तानाजी सिंदाळकर यांचा होता. या कार्यक्रमाला परिसरातील भावीक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

**कॅप्शन** : येरोळ येथील काल्याच्या कार्यक्रमात कीर्तन करताना शिभप त्र्यंबक महाराज नंदगावकर उपदेशपर किर्तन करताना व उपस्थित भाविक.

## तालुक्यामध्ये सरसकट पंचनामा करण्यात यावा -शेतकरी नेते सुनील देवरे यांची मागणी

### गारपिटामुळे बाधित झालेल्या शेतांची केली पाहणी

**दैनिक युवक आधार**
**जळगाव:(आनंद पवार)**

गुरुवारी रात्री पारोळा तालुक्यातील आडगाव सावरखेडे,करमाड, जिराळी,तामसवाडी मुंदाने यासह जवळपास ६० टक्के शिवारात वादळी वारा सह अवकाळी पावसाने थैमान घातल्याने त्यामुळे शेतकऱ्यांचे ज्वारी,बाजरी,कांदा, डाळिंब,लिंबू,पपई, मक्का या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी राजा आर्थिक संकटात सापडला आहे. तोंडाशी आलेला घास अवकाळीने पावसाने हिरावून घेतला आहे असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून शासनाकडून तात्काळ सरसकट पंचनामे करण्यात यावेत व शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानाची नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र शेतकरी संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष व शेतकरी नेते सुनील देवरे यांनी केली आहे.

सकाळी आठ वाजता शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचून



शेतकऱ्यांच्या अडचणीत तत्पर असणारे शेतकरी नेते सुनील देवरे यांनी तहसीलदार अनिल पाटील,तालुका कृषी अधिकारी श्री.आहेर यांच्यासोबत दूरध्वनीवरून संपर्क साधून पंचनामा करण्यासंदर्भात चर्चा केली.

शेतकऱ्यांना शासनाने कर्जमाफी संदर्भात हुलकावणी दिली असून आता अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांना पुन्हा अडचणीत आणले आहे आता तरी शासन अडचणीत आलेल्या शेतकऱ्याला बाहेर काढेल का? व शेतकऱ्यांचा आर्थिक उन्नती होईल का ?असे प्रश्न उपस्थित होत आहेत.

## श्रीराम जन्मोत्सव निमित्त भव्य शोभायात्रा, तालुक्यातील समस्त हिंदू बांधवांना उपस्थित राहण्याचे आवाहन, श्री शिवप्रतिष्ठान हिंदूस्थान तर्फे करण्यात आले आहे

**दैनिक युवक आधार**
सेलू प्रतिनिधी (गणेश सवने)

सेलू, प्रति गेल्या वर्षी प्रमाणे या ही वर्षी श्री राम जन्मोत्सवा निमित्त या हि वर्षी अति उत्साहात निघणार भव्य दिव्य मिरवणूक या मिरवणूकीची सुरवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारक पासुन होणार आहे, 4 वाजुन 30 मिनिटांनी आयोध्या येथील असलेली हुबेहुब श्रीरामाच्या मूर्ती चे वैदिक पद्धतीने पुजन होऊन, नंतर मिरवणूकीला सुरवात होईल, या मध्ये संगमनेर येथील हिंदू राजा अघोरी पथक, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या देखावा, स्थानिक कलाकार यांचा मर्दानी खेळ,स्थानिक




हिंदू मुलींचे लेझीम, झांज पथक,डिजे, मोरया वाला,वारकरी संप्रदाय विशेष म्हणजे छत्रपती धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जिवन चरित्र्यावरिल रोद्र शंभू महानाट्य सादर करण्यात येणार आहे, मिरवणूकीचा मार्ग छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारक पासून ते संत गोविंद बाबा मठ ते सांरग गल्ली ते मारवाडी गल्ली ,फुलारी गल्ली ते शेरे गल्ली, ते केशवराव बाबासाहेब महाराज चोक येथे रोद्रशंभु महानाट्य व महाआरती नंतर भव्य आतिषबाजी नंतर समारोप होईल,

## निहारिकाने पटकावले आंतरराष्ट्रीय अश्वक्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक

### भारतीय विद्यार्थिनीने बेल्जियम मधील अझेलहॉफ सीएसआय लियर अश्वक्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला

**दैनिक युवक आधार.**
**मुंबई प्रतिनिधी**

**मुंबई,** ३ एप्रिल २०२५ : कौशल्य आणि समर्पण यांचा उत्तम मिलाफ सादर करीत निहारिका सिंघानिया या तरुण भारतीय विद्यार्थिनीने बेल्जियममध्ये नुकत्याच पार पडलेल्या प्रतिष्ठित अझेलहॉफ सीएसआय लियर अश्वक्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आणि देशाला सन्मान मिळवून दिला. उद्योगपती आणि रेमंडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक गौतम सिंघानिया यांची ज्येष्ठ कन्या असलेल्या निहारिकाने या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध अपूर्व कौशल्य आणि धैर्य दाखवत सुवर्णपदक जिंकले. तिच्या विजयानंतरच्या समारंभात भारतीय राष्ट्रगीताच्या पार्श्वसंगीताने हा क्षण जागतिक स्तरावर देशासाठी अभिमानास्पद बनवला. गौतम सिंघानिया, निहारिकाचे वडील, उद्योगपती आणि रेमंडचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक," यांनी इन्स्टाग्राम आणि एक्स या समाजमाध्यमांवर या गौरवशाली क्षणाबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या. हे केवळ निहारिकासाठीचे वैयक्तिक यश नसून संपूर्ण भारतातील विद्यार्थ्यांसाठी ही प्रेरणादायी घटना आहे. मुला-मुलींच्या शैक्षणिक प्रवासासोबतच त्यांच्यातील विविध प्रतिभांना संधी देण्याचे महत्त्व या यशातून अधोरेखित होते. कठोर प्रशिक्षण, समर्पण आणि प्रबळ इच्छाशक्ती यांच्या जोरावर सर्वोच्च स्तरावर यश मिळवता येते, याचे हे उत्तम उदाहरण आहे." निहारिकाचे यश हे चिकाटी, शिस्त आणि मेहनतीच्या मूल्यांचे प्रतीक आहे. के-१२ शिक्षण प्रणालीत सहसा हे गुण महत्त्वाचे मानले जातात. निहारिकाचा हा विजय तरुण भारतीयांच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्षमतांना अधोरेखित करतो. योग्य पाठिंबा व निर्धार यांच्या जोरावर विद्यार्थी पारंपरिक शैक्षणिक मर्यादांच्या पुढे जाऊन जागतिक स्तरावर भारताचा नावलौकिक वाढवू शकतात, हे या विजयातून सिद्ध होते.



## तळोजा अतिरिक्त औद्योगिक क्षेत्र; शेतकऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकारातून बैठक

### मंत्री उदय सामंत यांचा सकारात्मक प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

तळोजा अतिरिक्त औद्योगिक क्षेत्राच्या भूसंपादनात समाविष्ट गावांतील बाधित शेतकऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकारातून राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या समवेत आज मुंबईत महत्वपूर्ण बैठक पार पडली. त्या अनुषंगाने झालेल्या चर्चेतून उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. मंत्रालयात मंत्री उदय सामंत यांच्या दालनात झालेल्या या बैठकीला आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळात चिंध्रण, महालुंगे, कानपोली प्रकल्पग्रस्त सामाजिक संघटनेचा सहभाग होता. त्यामध्ये भाजपचे तालुका खजिनदार शिवाजी दुर्गे, माजी जिल्हा परिषद सदस्य एकनाथ देशेकर, चिंध्रण सरपंच एकनाथ पाटील, कानपोली सरपंच मदन मते, खानाव सरपंच मनोहर आरीवले, मोहन कडू, अरुण देशेकर, नरेश सोनावळे, गणपत कडू, ज्ञानदेव पाडेकर, सज्जन पवार, अनंता कडू, अनंता गडगे, भगवान कडू आदींचा समावेश होता. या बैठकीला संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. आमदार प्रशांत ठाकूर यांनी शेतकऱ्यांची बाजू मांडत त्यांच्या मागण्या योग्य असल्याचे निदर्शनास आणून दिले. यावेळी मंत्री उदय सामंत यांनी या बाबतीत शासन शेतकऱ्यांच्या



हितासाठी कटिबद्ध असल्याचे अधोरेखित केले. तळोजा अतिरिक्त एमआयडीसीकरीता पनवेल तालुक्यातील चिंध्रण, कानपोली व महालुंगे या गावातील शेतकऱ्यांच्या जमीनी संपादन करण्याची प्रक्रिया करण्यात येत आहे. या भूसंपादनाने बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांनी, त्यांच्या मागण्यांबाबत लोकप्रतिनिधी आमदार प्रशांत ठाकूर, भूसंपादन अधिकारी तथा पनवेल उप विभागीय अधिकारी, एमआयडीसी प्रादेशिक अधिकारी यांना निवेदन दिले होते. या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी शेतकऱ्यांना न्याय मिळण्याच्या दृष्टिकोनातून उद्योगमंत्री उदय सामंत यांना पत्रव्यवहार करत बैठकीचे आयोजन करण्याची मागणी केली होती. त्या अनुषंगाने हि बैठक झाली. बाधित शेतकरी, भूसंपादन अधिकारी व एमआयडीसीचे अधिकारी यांची संयुक्त बैठक झाली होती. या बैठकीत बाधित शेतकऱ्यांनी बाधित शेतकऱ्यांना जमीन संपादनाच्या मोबदल्यात देण्यात येणारी नुकसान भरपाई, भूखंड परतावा, भूखंड देताना ईएमडी व डेव्हलपमेंट चार्जेस आकारले जावु नयेत, तसेच संपादित होणाऱ्या जमिनीमधील घर, झाडे, विहिरी, तलाव, बोअरवेल यांची नुकसान भरपाई देण्यात यावी. संपादित गुरचरण जमीनी ऐवजी गुरचरणासाठी पर्यायी भूखंड मिळावा, अशी मागणी केली होती. आणि त्या मागण्या एमआयडीसीकडे पाठविण्याचे भूसंपादन अधिकारी तथा पनवेल उप विभागीय अधिकारी यांनी मान्य केले होते. या मागण्या उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत एमआयडीसीला कळविण्यात आल्यानंतर देखील या संदर्भामध्ये शेतकऱ्यांशी अथवा शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींशी कोणत्याही प्रकारची चर्चा झाली नव्हती. त्यामुळे जमिनीचा प्रति गुंठा मोबदला ठरविण्यात आला त्यावेळेला तो झाडे त्याचबरोबरीने घरे, विहीरी, तलाव, बोअरवेल यांच्या व्यतिरिक्त हा मोबदला असल्याची ग्रामस्थांची समजूत होती आणि तसे एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी देखील सांगितले, त्यामुळेच सदरचा मोबदला शेतकऱ्यांनी स्वीकारला. मात्र जागेत घरे, झाडे, विहीरी, तलाव, बोअरवेल आहेत त्याचे स्वतंत्र पेमेंट मिळणे आवश्यक असल्याने यासंदर्भात ग्रामस्थांशी कुठलीही चर्चा न घेता एमआयडीसी अथवा राज्य सरकार एकतर्फी निर्णय घोषित करणे हा शेतकऱ्यांवरती अन्याय होईल म्हणूनच आमदार प्रशांत ठाकूर यांनी या विषयावर मंत्री उदय सामंत यांचे व शासनाचे लक्ष वेधले. संपादित होणाऱ्या जमिनीमधील घर, झाडे, विहिरी, तलाव, बोअरवेल यांची नुकसान भरपाई, याव्यतिरिक्त भूसंपादनाचा १० टक्के परतावा भूखंड विषयावरही सकारात्मक चर्चा झाली. तसेच रोजगाराच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांना प्रशिक्षण देण्याचेही या बैठकीत मान्य करण्यात आले. एकूणच या बैठकीत सकारात्मक चर्चा होऊन शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने महत्त्वाची चर्चा झाली आणि सरकारने सकारात्मक भूमिका दर्शवली.

## स्व.शांताताई शिंदे यांच्या जयंती निमित्त वाशिम येथे भव्य रक्तदान शिबीर संपन्न..

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी**

**करण धोंगडे :-** वाशिम :-शिंदे गुरुजी प्रसारक मंडळ, वार्ला तथा शांतीनिकेतन महिला विकास समिती वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने गौरी शंकर विद्यालय नालंदा नगर वाशिम येथे दि.1एप्रिल 2025 रोजी शांताताई शिंदे( मा.जि.शिक्षण अधिकारी ) यांच्या 81 व्या जयंती च्या निमित्ताने दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी भव्य रक्तदान शिबराचे आयोजन करण्यात आले सदर शिबरामध्ये 61 रक्तदात्यानी रक्तदान दिले, अमरावती विभागीय शिक्षक मतदार संघांचे आमदार ऍड.किरणराव जी सरनाईक यांची उदघाट्क म्हणून उपस्थिती लाभली, तर अध्यक्षस्थानी श्री.विजयरावजी शिंदे सर यांची उपस्थिती लाभली, उदघाटक ऍड. श्री. किरणराव सरनाईक यांनी रक्तदान केल्याने गरजू व्यक्तींचे जीव वाचविल्या जावू शकतो, रक्तदान हेच श्रेष्ठ दान आहे, ते प्रत्येकानी केले पाहिजे, रक्तदानाचे मानवी जीवनात असलेले महत्व सांगितले, यावेळी अनेक मान्य वरांनी स्व. शांताताई शिंदे यांच्या समाज उपयोगी कार्यावर प्रकाश टाकला, व त्यांच्या आठवणींना उजाळा दिला, या शिबीरामध्ये जिल्हातील सामाजिक राजकीय चळवतील मंडळींनी रक्तदान देऊन कार्यक्रमास उपस्थिती दर्शवली त्यांचसोबत समाजकारणात सक्रिय असलेल्या सरस्वती समाजकार्य महाविद्यालयातील नवंतरुणांनी देखील रक्तदान देऊन सहभाग नोंदविला, यावेळी




श्री.राजेंद्र शिंदे ( मा.शिक्षण अधिकारी जि. प.वाशिम )श्री. आकाशजी आव्हाळे ( शिक्षणअधिकारी जि.प. वाशिम)महिला समुपदेशन केंद्राच्या समुपदेशन समितीच्या अध्यक्ष सौ.वैशाली ताई आरु, श्रीमती करुणाताई कल्ले, संस्थेचे सचिव श्री.संजय शिंदे सर,श्री.बाळासाहेब गोरे, श्री.सतीश शेवदा( न.प. मुख्याधिकारी रिसोड) ज्ञानेश्वर वाघ,डॉ.विजयराव नाले, डॉ. कव्हर,डॉ.सदार,डॉ.बकाल,डॉ. बोरकर,डॉ. परमानंद मुसळे, डॉ. इंगळे, नानाभाऊ देशमुख, डॉ. ढोबळे सर, डॉ. पोफळे, यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला कार्यक्रमाला जिल्हा रक्तसंकलन अधिकारी डॉ. हरिदास बिलाई,जनसंपर्क अधिकारी सचिन दंडे , रक्तपेढी सहाय्यक सिद्ध विनायक स्वामी, गणेश वैद्य, प्रियंका सावंत, सुनील सावके शासकीय रक्तपेढी वाशिम संपूर्ण टीम यावेळी उपस्थित होती,

# स्वता आमदार काका येऊन करणार शुभ सकाळ :शाळेच्या पहिल्या दिवशी.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

शाळेचा पहिला दिवस म्हणजे प्रत्येक विद्यार्थी आणि आईवडिलांना हि अविस्मरणीय असा दिवस, खुप साऱ्या प्रश्नांचा त्याहून अधिक उत्सुकतेचा, गोंधळाचा. असे असले तरी शासनाकडून एक विद्यार्थ्यां साठी अनोखी भेट म्हणजे आमदार काका शुभ सकाळ बोलून विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी, तसेच शाळांना अत्याधुनिक सुविधा मिळाव्यात यासाठी शासन प्रशासनातर्फे प्रयत्न केले जात आहेत. यासाठी विविध उपक्रम ही राबवले जातात. आता शालेय शिक्षण विभागाने जाहीर केलेल्या "१०० शाळांना भेटी" या उपक्रमांतर्गत शाळेच्या पहिल्या दिवशी आपल्या क्षेत्रातील आमदार शाळेला भेट देणारा असून विद्यार्थ्यांसोबत संवाद साधणार आहेत. आमदारांसह अधिकारी ही शाळांना भेट देणार.

शाळा कोणत्या तेही आमदारांकडून



कळवले जाणार आहे. शिक्षण विभाग तसा आढावा घेणार आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरण मिळावे त्यांच्या मनात शिक्षणाविषयी उत्सुकता निर्माण व्हावी यासाठी हा उपक्रम राबवला जाणार आहे

. शाळातील कामकाजांचा शैक्षणिक गुणवत्तेचा व इतर सोयी सुविधांचा आढावा घेणार शाळा व्यवस्थापन समिती ग्रामपंचायत सदस्य सरपंचांशी चर्चा करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेण्याकडे कल कसा वाढेल याबाबत आवश्यक उपयोजना करण्याबाबत सुचवले जाणार आहे. या भेटीदरम्यान लोकप्रतिनिधी अधिकारी हे शाळेच्या भौतिक सुविधेचा दर्जा विद्यार्थ्यांच्या खेळाच्या सुविधेचा दर्जा, शाळेतील पूरक व्यवस्था, विद्यार्थ्यांच्या स्वच्छतेच्या सवयी, शालेय पोषण आहार सारख्या विविध विषयांचा आढावा घेऊन चर्चा करून अत्यावश्यक सुविधांसाठी मार्गदर्शन करणार आहेत. तसेच शाळेतील धोकादायक बांधकाम,पाण्या अभावी बंद शौचालय यासारख्या मूलभूत समस्या आढळल्यास संबंधित यंत्रणेला तात्काळ आवश्यक ती पावले उचलण्याबाबत ठोस सूचना करतील त्यामुळे शाळेच्या समस्यांची सोडवणूक होण्यास मदत होणार आहे.

# प्रखर उन्हाच्या तडाख्यात जिम मध्ये घाम गाळणे हे धोक्याचे.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर /उरण प्रतिनिधी**

आरोग्यम धनसंपदा या उक्तीप्रमाणे आपले आरोग्य चांगले रहाण्यासाठी नियमित व्यायाम म्हणजे फक्त तंदुरुस्तच नाही तर वजन कमी करणे, त्याचप्रमाणे आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याचे संतुलन राखण्यासाठी हि महत्त्वाचे आहे. दिवसेंदिवस नागरिकांमध्ये आरोग्य विषयी जागरूकता वाढू लागली असून नियमित व्यायाम करणाऱ्यांच्या संख्येतही वाढ झाली आहे .परंतु काही वेळेस व्यायामाच्या अतिरेकामुळे काही व्यक्तींचा मृत्यू झाल्याच्या घटनाही निदर्शनास येत आहेत. त्यामुळे व्यायामाचा अतिरेक नको व शरीराची भाषा समजून व्यायाम करावा. असे आवाहन वैद्यकीय ,फिटनेस तज्ञांनी केले आहे. जिम मध्ये व्यायाम करताना किंवा क्रिकेट खेळताना हृदयविकाराचा झटका आल्याच्या घटना किती तरी वेळा आपणास ऐकावयास मिळत आहेत. त्यामुळे व्यायाम शरीरास फायदेशीर जरी असला तरी तो किती व कधी करावा याची काळजी घ्यावी याविषयी अनेकांच्या मनामध्ये संभ्रम निर्माण झाला आहे तो दूर करण्यासाठी फिटनेस ट्रेनर च्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे .व्यायाम हा शरीरासाठी लाभदायक असतो . व्यायाम करताना शरीराची भाषा ऐकली पाहिजे.शरीराला पुरेसा आराम पाहिजे. आराम नसेल अस्वस्थ वाटत असेल तर जास्त व्यायाम करू नये. आरामच करावा .व्यायाम करण्याचा आनंद घेता येईल एवढाच व्यायाम करावा. व्यायाम सुरू केला की टप्प्याटप्प्याने तो वाढवावा एकदम वाढ करण्याचा प्रयत्न करू नये आज पाच किलोमीटर धावले की उद्या दहा किलोमीटरचा





हट्ट धरू नये. जिम मध्ये ही तीच काळजी घ्यावी टप्प्याटप्प्याने व्यायामात वाढ करावी व आपल्या शारीरिक तंदुरुस्तीमध्ये तो कमी जास्त करता आला पाहिजे.व्यायामा शरीरासाठी लाभदायक असतो परंतु व्यायाम करताना आपल्या शरीराची भाषा ऐकली पाहिजे.

# मुंबई उपनगराला कुपोषणाचा विळखा

- १६ हजार कुपोषित बालकांची नोंद
- बालकांच्या सृदृढ आरोग्यासाठी उपाययोजना करा : पालकमंत्री आशिष शेलार

**मुंबई :** मुंबई उपनगरात तब्बल १६ हजार कुपोषित बालकांची नोंद झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. दरम्यान, कुपोषित बालकांच्या सुदृढ आरोग्यासाठी उपाययोजना करा आणि १० दिवसांत लेखी अहवाल सादर करा, असे निर्देश मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी पालिका प्रशासनाला दिले.

अंगणवाडी सेविकांच्या प्राथमिक पाहणीत १६,३४३ कुपोषित बालके असल्याचे निदर्शनास आल्याने उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयात गुरुवारी पालकमंत्री ॲड. शेलार यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकीला जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांच्यासह महिला व बाल विकास विभाग आणि मुंबई पालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.



### लवकरच बाल विकास केंद्र सेवेत!

कुपोषण निर्मूलनासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलण्यास सुरुवात केली असून, मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून तपासणीला गती देण्याचा प्रयत्न सुरू आहे. तसेच, तपासणीअंती आढळणाऱ्या सर्व तीव्र कुपोषित बालकांसाठी लवकरच शहरी बाल विकास केंद्र सुरू करण्याचे नियोजन असल्याचे शेलार यांनी यावेळी सांगितले.

मुंबई उपनगरातील एकात्मिक बाल विकास सेवा विकास यंत्रणेच्या पोषण ट्रॅकर ॲपवर फेब्रुवारी २०२५ मध्ये एकूण २ लाख ३८ हजार ९४ बालकांची नोंद घेतली गेली. यातील २ लाख ३४ हजार ८९६ बालकांचे वजन आणि उंची मोजण्यात आली. यानुसार अंगणवाडी सेविकांनी अंगणवाडी स्तरावर वजन आणि उंची घेऊन पोषण ट्रॅकर ॲपवर अतितीव्र कुपोषण म्हणून २ हजार ८८७, तर मध्यम तीव्र कुपोषण म्हणून १३ हजार ४५७ बालकांची नोंद केली आहे.

या नोंद झालेल्या अति तीव्र आणि मध्यम तीव्र कुपोषित बालकांची राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत ऑक्टोबर २०२४ ते फेब्रुवारी २०२५ अखेरपर्यंत आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यामधून १,१५९ बालके तीव्र, तर ३,०९६ मध्यम तीव्र कुपोषित असल्याचे निष्पन्न झाले, तर फेब्रुवारी २०२५ मध्ये अतितीव्र कुपोषित ४५० आणि मध्यम तीव्र कुपोषित ४०७ बालके आढळली आहेत. मात्र, या संख्येचे अधिकृत प्रमाणिकरण करण्यात येत असून मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत तपासणी सुरू असल्याचे यावेळी बैठकीत सांगण्यात आले.

# दूध भेसळखोरांविरोधात एफडीए ॲक्शन मोडमध्ये

- मंत्री झिरवाळ ग्राऊंड झीरोवर
- दीड लाखांच्या दुधाची तपासणी



### टोल फ्री क्रमांकावर तक्रार नोंदवा

दूध व दुग्धजन्य अन्नपदार्थांची गुणवत्ता व दर्जाबाबत कोणतीही तक्रार असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती प्रशासनाच्या १८००-२२२-३६५ या टोल फ्री क्रमांकावर नोंदवावी, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागाचे सह आयुक्त मंगेश माने यांनी केले आहे.

**मुंबई :** दुधात भेसळ करून लोकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांविरोधात अन्न व औषध प्रशासन विभाग ॲक्शन मोडमध्ये आला आहे. दहिसर, ऐरोली व मानखुर्द जकात नाक्यावर १ एप्रिलच्या रात्रीपासून २ एप्रिलला पहाटेपर्यंत ७९ वाहनांची तपासणी घेण्यात आली. यावेळी १ लाख ५१ हजार ८९४ लिटर दुधाचा साठा तपासण्यात आला असून यापैकी १०८ दुधाचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल, अशी माहिती अन्न व औषध प्रशासन विभागाचे सह आयुक्त मंगेश माने यांनी दिली. दरम्यान, रात्रीच्या कारवाईवेळी अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी ग्राऊंड झीरोवर उतरून वाहनांची व दुधाची तपासणी केली.

मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत प्रवेश करणाऱ्या दुधाच्या टँकरची तपासणी करण्यासाठी तीन मुख्य नाक्यांवर १ एप्रिलच्या रात्रीपासून २ एप्रिलला पहाटेपर्यंत दूध तपासणीची विशेष मोहिम राबविण्यात आली. मुंबईत मध्यरात्री प्रवेश करणाऱ्या दूध वाहनांच्या तपासणीत मानखुर्द (वाशी) चेक नाका येथे ५१ वाहने आणि १,०४,५३८ लिटर दुधाचा साठा, दहिसर चेक नाका येथे १० वाहने आणि २७,७०४ लिटर दुधाचा साठा आणि ऐरोली चेक नाका येथे १८ वाहने आणि १९,६५२ लिटर दुधाचा साठा तपासण्यात आला. या मोहिमेत एकूण ७९ वाहनांची तपासणी करण्यात आली असून १,५१,८९४ लिटर दुधाचा साठा तपासण्यात आला. यात विविध ब्रँडच्या दुधाचे पाऊच, पिशवी पॅकिंग व सुट्ट्या स्वरूपातील एकूण १०८ दुधाचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले.

## 'वर्सोवा जेट्टीच्या आधुनिकीकरणासाठी पॅकेज जाहीर करा'

**मुंबई :** वर्सोवा खाडीतील पाणी प्रदूषित झाले असून यामुळे येथील मच्छिमारी व्यवसायावरही परिणाम झाला आहे. वर्सोवा जेट्टीची मोठ्या प्रमाणात दूरवस्था झालेली आहे. या काणी अनेक गैरसोय असल्याने येथील वर्सोवा जेट्टीचे मजबुतीकरण, आधुनिकीकरण व मच्छिमारांच्या संरक्षणासाठी केंद्र सरकारने विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करावे, अशी मागणी खासदार रवींद्र वायकर यांनी गुरुवारी लोकसभेत शून्य प्रहरावेळी केली.

वर्सोवा जेट्टीचे मजबुतीकरण व आधुनिकीकरण करणे गरजेचे आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची गरज आहे. यासाठी सरकारने विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करावे. या पॅकेजमध्ये आधुनिक सोयी सुविधांनी युक्त जेट्टीची निर्मिती, कोल्ड स्टोरेज, स्वच्छता, बोटींची सुरक्षितता, कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था, खाडीच्या किनाऱ्यावर बोटी पार्क करण्याची व्यवस्था आदींचा समावेश करण्यात यावा, अशी मागणी वायकर यांनी केली.

# वैनतेय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी मिळवले यश

## राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

**निफाड :-** राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत वैनतेय विद्यालयाच्या इयत्ता 8 वी च्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे डिसेंबर 2024 महिन्यात इयत्ता 8 वी च्या विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा संपन्न झाली होती या परीक्षेत कृष्णा वैभव वाळुंज , श्लोक पुरुषोत्तम नागरे, हर्षद दिनेश वडघुले ,स्वरा संदीप मगर, चैताली कमलेश चोरडिया, अनुष्का हेमंत घुमरे हे सहा विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र ठरले आहे या विद्यार्थ्यांना संतोष ससाणे यांचे मार्गदर्शन लाभले न्या रानडे विद्या



प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे, सचिव रतन पाटील वडघुले ,विद्यालयाचे प्राचार्य बी. आर . सोनवणे , उपप्राचार्या मनीषा गुजराथी, पर्यवेक्षक गुलाब टकले पर्यवेक्षक बी. बी गुंजाळ यांच्या उपस्थितीत या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आ।ला ,यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे न्या रानडे विद्या प्रसारक मंडळाचे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे, विश्वस्त अड. ल. जि. उगांवकर, रतन पाटील वडघुले, किरण कापसे, राजेंद्र राठी , अड. दिलीप वाघवकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे , मधुकर राऊत,विश्वास कराड, नरेंद्र नांदे, वैनतेय विद्यालयाचे प्राचार्य बी.आर.सोनवणे, उपप्राचार्या श्रीमती मनीषा गुजराथी , पर्यवेक्षक गुलाब टकले, पर्यवेक्षक बी.बी. गुंजाळ यांनी अभिनंदन केलें

# अन्यायग्रस्त विद्यार्थ्यांना त्वरित न्याय द्या - राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड - स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने एम.ए. सोशॉलॉजी प्रथम सत्र परीक्षेच्या निकालात मोठी चूक करत असंख्य विद्यार्थ्यांना अनुपस्थित दर्शवले आहे. हे विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेला हजर होते, तरीही चुकीच्या निकालामुळे त्यांचे पुढील शिक्षण धोक्यात आले आहे. आणि परीक्षा आवेदन पत्र भरण्यासाठी फक्त दोन दिवस सुटले आहेत. त्यामुळे त्यांना परीक्षेचे आवेदन पत्र भरण्यासाठी पण सूट द्यावी या चुकीच्या विरोधात राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष फैसल सिद्दीकी यांनी विद्यापीठ प्रशासनाला तातडीने सुधारित निकाल जाहीर करण्याची मागणी केली आहे. तसेच, निकाल त्वरित दुरुस्त न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. यावेळी निवेदन देताना राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष फैसल सिद्दिकी, अमितसिंघ सुखमणी, रोहित पवार, मोहसीन खान, लकीसिंघ जागीरदार, अभिषेक शिंदे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.**

# उद्योग क्षेत्रात नवनवीन संकल्पना राबविणारे ॲल्युमिनियम मॅन भरत गिते यांना राज्यस्तरीय लोकाशा भुषण अवार्डने सन्मान

## पालकमंत्री ना.अजितदादा पवार व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते वितरण

## उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या कडून भरत गित्ते यांचे भाषनातून केले कौतुक

**दैनिक युवक आधार**
**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :-** अल्युमिनियम मॅन भरत गीते हे भारताला अल्युमिनियम उद्योगाचे जागतिक केंद्र बनवण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यांची दूरदृष्टी निव्वळ व्यवसायापलीकडेही जाते. विकास, शिक्षण आणि देशाच्या विकासाप्रति त्यांची सखोल बांधिलकी आहे. उद्योग क्षेत्रात वेगळी भूमिका ओळख निर्माण करणारे परळीचे भूमिपुत्र अल्युमिनियम मॅन भरत केशवराव गिते यांना बीड येथे आयोजित कार्यक्रमात राज्यस्तरीय लोकाशा भुषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार, मंत्री ना.पंकजाताई मुंडेंच्या प्रमुख उपस्थिती भरत गित्ते यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. दरम्यान अल्युमिनियम मॅन भरत गिते म्हणाले की, संत ज्ञानेश्वर यांनी म्हटल्याप्रमाणे "इवलेसे रोप लावलेल्या द्वारी | त्याचा वेलू गेला गगनावरी ||" या उक्तीप्रमाणे माझे कार्य सुरू आहे. या पुरस्काराने माझी जबाबदारी व मला नवी उमेद देणारा आहे. येणाऱ्या काळात उद्योग क्षेत्रात नवनवीन संकल्पना राबवून नविन्य पूर्ण दृष्टीकोण उत्कृष्ट नियोजन, रोजगार यासाठी योगदान देणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच वडिलांचे उत्तम संस्कार आपल्यावर झाल्यामुळे आपले जीवन सुखी व समृद्ध झाले आहे. त्यामुळेच आपण इथपर्यंतचा प्रवास करू शकलो हे उपकार कधीच फिटणार नाही. शेतकरी




कुटुंबामध्ये जन्म होऊन पण, शिक्षणाचे महत्व जाणणारे व ज्यांच्याकडून उद्योगाचे बाळकडू घेतले असे माझे स्वर्गीय वडील केशवराव गिते यांना हा बहुमान समर्पित करतो असे ते म्हणाले. दरम्यान उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्याकडून भरत गिते यांच्या उद्योग क्षेत्रातील कार्याचे भाषणातून केले तोंडभरून कौतुक करत अभिनंदन केले.

बीड येथे लोकाशाच्या वर्धापन दिनानिमित्त दि.31 मार्च ते 2 एप्रिल दरम्यान लोकाशा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. लोकाशा महोत्सवाचा समारोप राज्याचे उपमुखमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार आणि पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. तसेच याच सोहळ्यात राज्यातील नवरत्नांना लोकाशा भुषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये उद्योग क्षेत्रात केलेल्या योगदानाबद्दल तौरल इंडिया प्रायव्हेट.लि. कंपनीचे एमडी तथा सीईओ आणि उद्योग जगतात आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक करणाऱ्या उद्योजक तथा परळीचे भूमिपुत्र अल्युमिनियम मॅन भरत केशवराव गिते यांना लोकाशाच्या वर्धापन दिनानिमित्त दिला जाणारा राज्यस्तरीय नवरत्न लोकाशा भुषण पुरस्कार ना.अजितदादा पवार आणि ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप प्रत्येकी एक लक्ष रुपये रोख, सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह असे होते. भरत गिते यांनी उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करुन कामगिरी केली आहे. यापूर्वी ही त्यांनी केलेल्या उद्योग क्षेत्रातील कार्यामुळे याआधी बऱ्याच राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानीत झालेले आहेत. भारतीय उत्पादन क्षेत्रात जागतिक पातळीवरील सर्वोत्तम पद्धतींचा समावेश केलेला असून, मेक इन इंडियात योगदान दिले. तौरल इंडिया हे अल्युमिनियम कास्टिंग सोल्युशन्स मध्ये जागतिक पातळीवर आघाडीवर गेले आहे. औद्योगिक क्षेत्रात ५०० कोटींची गुंतवणूक आणि १,२०० रोजगार निर्मिती यासाठी एका आंतरराष्ट्रीय कंपनीचा प्रमुख म्हणून महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांबरोबर सामंजस्य करार केला. हा क्षण प्रत्येक परळीकरासाठी अभिमानाचा ठरला. सामंजस्य करार यामुळे स्थानिक युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार असून, राज्यातील औद्योगिक विकासाला नवी चालना मिळेल. राज्याच्या औद्योगिक आणि आर्थिक प्रगतीला गती मिळणार आहे. त्यांनी उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत लोकाशाच्या वर्धापन दिनानिमित्त यावर्षीचा महत्वाचं हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. या पुरस्कार सोहळ्यास उद्योगपती शांतीलालजी मुथ्था, ओमप्रकाशजी चांडक, अभिनेता शयाजी शिंदे, आरोग्यदुत ओमप्रकाश शेटे, अँकर विलास बडे, अँकर निखीला म्हेत्रे, मंगेश चिवटे, हभप महादेव महाराज चाकरवाडीकर, शिवाजी महाराज नारायणगड, आमदार विजयसिंह पंडीत, आमदार विक्रम काळे, आमदार सतिष चव्हाण, कुस्तीपट्टू राहूल अवारे, यांच्यासह टीव्ही संपादक रोशन शेठ बंब, कार्यकारी संपादक प्रताप नलावडे, निवासी संपादक उत्तमभाऊ हजारे, उपसंपादक अभिजित नखाते, मुकेश झणझने, व्यवस्थापक अतुल भालशंकर सह राज्यातील अनेक दिग्गज नेत्यांसह बीड जिल्ह्यातील खासदार, आमदार व सर्व लोकप्रतिनिधींची तसेच सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, व्यापारी, पत्रकार, डॉक्टर्स, यांच्यासह सर्व स्तरातील जिल्ह्यातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरस्कार हा एक आनंद असतो, जो आणखी जास्त जबाबदारी देऊन जातो, असेच समजणारा मी आहे. आज लोकाशा परिवाराने मला इथे पुरस्कार देऊन सन्मानित केले या बद्दल मी पुनःछ संपादक तथा आयोजक विजयराज बंब आणि समूहाचे आभार मानतो. तरुणांनो आपल्याकडे कोरडवाहु जमिनी बरोबरच वंशपरंपरेने जिद्द, चिकाटी प्रचंड मेहनत व दूरदृष्टी या भागाने दिली आहे, तिचा योग्य ठिकाणी वापर कराल तर बीड चे सकारात्मक नाव पुढच्या एका दशकांमध्ये फक्त भारत नाही तर जगाच्या पाठीवर झळकवाल हा माझा विश्वास आहे. तसेच जिल्ह्यात नव उद्योजक घडविण्याचा आपला संकल्प असल्याचे आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त उद्योजक भरत गित्ते यांनी पत्रकार बांधवाना बोलतांना व्यक्त करतांना सांगितले.

उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या कडून भरत गिते यांचे भाषनातून केले कौतुक

नंदागौळ या छोट्या खेड्यामध्ये शेतकरी कुटुंबात जन्मलेलले युवक आज एक यशस्वी उद्योगजक भारताचे अल्युमिनियम मॅन भरत गिते यांना पुरस्कार देण्यात आला. शेतकरी कुटुंबामध्ये जन्म होऊन पण, शिक्षणाचे महत्व जाणणारे व ज्यांच्याकडून उद्योगाचे बाळकडू घेतले. भरत गिते यांनी उद्योग क्षेत्रात परळीसह बीडला राज्याला देशाला नवीन ओळख करून दिल्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यांच्या उद्योग क्षेत्रात कारकीर्दला त्यांनी शुभेच्छा दिल्या. परळी वैद्यनाथ तालुक्यातील नंदागौळ गावातील एका शेतकरी कुटुंबात जन्म झाला. दहावी पर्यंत शिक्षण परळीत पूर्ण केले. लातूर दयानंद कॉलेज मधून अकरावी व बारावी शिक्षण पूर्ण केले. जर्मनी येथे उद्योग क्षेत्रातील उत्कृष्टता, कौशल्यविकास व उत्पादन व्यवस्थापन शिकवले. हे सर्व काही महाराष्ट्रात आपल्या मातीसाठी, लोकांसाठी लागू करण्याच्या संकल्पनेने भारतात परत आलो. मागील दहा वर्षात पुण्यातील चाकण येथे एक सक्षम उद्योग मेक इन इंडियाच्या उपक्रमा अंतर्गत उभा करून ऊर्जा, संरक्षण, रेल्वे आरोग्य या अनेक क्षेत्रात तौरल इंडिया भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठी सेवा पुरवत आहे. देशातील उद्योग क्षेत्रात भरारी घेतली. आज त्यांच्या तौरल इंडिया प्रायव्हेट. लि. कंपनीचा हजारो कोटीचा टर्नवर आहे. हजारोच्या जवळपास कामगार काम करतात. नुकताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली डावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक गुंतवणूक परिषदेत औद्योगिक क्षेत्रात ५०० कोटींची गुंतवणूक आणि १,२०० रोजगार निर्मिती यासाठी महत्त्वाचा सामंजस्य करार करण्यात आला. म्हणून भरत गिते यांची अल्युमिनियम मॅन म्हणून ओळख निर्माण झाली असे उपमुख्यमंत्री अजितदादा म्हणाले. विमान, जहाज बांधणी, ऊर्जा, संरक्षण, रेल्वे आरोग्य अशा अनेक क्षेत्रातसाठी अल्युमिनियम पार पार्ट तयार करते. बनवलेलं पार्ट स्वीत्झर्लंड, जर्मनी, अमेरिका, इंग्लड, चायना, साऊथ कोरिया विविध देशात निर्यात होतात. भरत गिते यांच्या उद्योग क्षेत्रातील कार्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांच्याकडून भाषणातून तोंड भरून कौतुक केले. नवीन पिढीला त्यांनी आवाहन केले की, कष्ट करण्याची ताकत असेल तर माणूस यशस्वी होऊ शकतो काय उभ करू शकतो हे आपण भरत गित्ते यांच्या रूपाने पहिले. चुकीच्या रस्तानी जाऊ नका असे आवाहन उपमुख्यमंत्री ना. अजितदादा यांनी तरुण पिढीला केले आहे.